तरुण भारत



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात कार्यशाळेचे उद्घाटन करताना व्यवस्थापन परिषद सदस्य सिध्दार्थ शिंदे. सोबत कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. पी. टी. गायकवाड, डॉ. टी. एम. चौगले आदी.

# नैसर्गिक संसाधने संवर्धनासंदर्भात विद्यापीठात कार्यशाळा उत्साहात

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ विद्यार्थी विकास विभाग व राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने महाराष्ट्र शासन उच्च शिक्षण विभाग व युनिसेफ पुरस्कार नैसर्गिक संसाधने संरक्षण व संवर्धन आणि पाणी बचत या विषयावर एकदिवसीय कार्यशाळा शिवाजी विद्यापीठाच्या निलांबरी हॉलमध्ये पार पडली. कार्यशाळेचे उदघाटन कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या हस्ते आणि राज्यपाल नियुक्त व्यवस्थापन परिषद सदस्य सिध्दार्थ शिंदे यांच्या उपस्थितीत केले.

महाराष्ट्र शासन व युनिसेफ पुरस्कृत या अभियानाच्या राज्य नोडल अधिकारी प्रतिभा दिक्षित यांनी कार्यशाळेचा उद्देश सांगितला. व्यवस्थापन परिषद सदस्य सिध्दार्थ शिंदे यांनी शाश्वत विकासाबाबत उपस्थितांना मार्गदर्शन केले. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी हवा, पाणी, पर्यावरण रक्षण व संवर्धन याबाबत मार्गदर्शन केले. विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. पी. टी. गायकवाड यांनी स्वागत केले. सुत्रसंचालन डॉ. ज्ञानराजा चिघळीकर यांनी केले. राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ. टी. एम. चौगले यांनी आभार मानले. यावेळी डॉ. ज्ञानराजा, डॉ. एन. एम. पाटील, डॉ. महादेव कांबळे, डॉ. एस. एन. पाटील, डॉ. एस. ए. सोनवणे आदी उपस्थित होते.

03 JUL 2023

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# दूरशिक्षण होणार आता आणखी स्मार्ट

## एमबीएच्या प्रवेशापासून ते निकालापर्यंत ऑनलाईन मूडवरच : भविष्यात सर्वच अभ्यासक्रम ऑनलाईन होण्याची शक्यता

**अहिल्या परकाळे**
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण विभागाला युजीसीची पाच वर्षाची मान्यता मिळाल्यानंतर दूरशिक्षण विभागाचा प्रगतीचा आलेख उंचावत आहे. आतापर्यंत दूरशिक्षण विभागातून शिक्षण घेतलेले लाखो विद्यार्थी विविध पदावर कार्यरत आहेत. नवीन शिक्षण कायद्याच्या प्रक्रियेत टीकून राहण्यासाठी दूरशिक्षण विभागाने एक पाऊल पुढे टाकत ऑनलाईन पध्दतीने एमबीएचा अभ्यासक्रम शिकवण्याचा निर्णय घेतला आहे. त्यादृष्टीने व्हिडीओ, ऑडीओ तयार केले असून ते विद्यार्थ्यांच्या लॉगईन आयडीच्या माध्यमातून दिले जाणार आहेत. याचाच अर्थ दूरशिक्षण केंद्र स्मार्ट बनत असून, भविष्यात सर्वच अभ्यासक्रम ऑनलाईन शिकवण्याचा मानस आहे.

नवीन शिक्षण कायद्यानुसार कौशल्याधिष्टीत शिक्षण देण्यास शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षणने सुरूवात केली आहे, असे म्हंटले तरी वावगे ठरणार नाही. एमबीए अभ्यासक्रमाचे वर्षभराचे व्हिडीओ तयार केले असून अपलोड केले जाणार आहेत. विद्यार्थ्यांना प्रवेशापासून ते परीक्षा अर्ज भरणे, परीक्षा, पेपरची तपासणी आणि निकालही ऑनलाईन पध्दतीने लावले जाणार आहेत. त्यासाठी विद्यापीठाने स्वत:चे सॉफ्टवेअर विकसित केले आहे. सॉफ्टवेअरच्या माध्यमातून राष्ट्रीय पातळीवरील एमबीएचा अभ्यासक्रम तयार केला असून, जगात कोठेही बसून या अभ्यासक्रमाचे शिक्षण विद्यार्थी घेवू शकतात. तसेच त्यांना पदवी प्रमाणपत्रही ऑनलाईन मिळणार आहे. आलेल्या अडचणी दूर करण्यासाठी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर संबंधीत विषयांच्या तज्ज्ञांचे, प्राध्यापकांचे नंबर दिले आहेत, या नंबरवर [illegible]ांनी संपर्क साधायचा आहे. अडचणीचे ऑनलाईन पध्दतीने निरसण केले जाणार आहे. तसेच सध्या या अभ्यासक्रमासह पारंपारिक बीए, बी.कॉम, बी. एस्सी गणित, एम. ए., एम. कॉम., एम. एस्सी. गणित अभ्यासक्रमाचे प्रवेश सुरू आहेत. विद्यापीठ दूरशिक्षण अंतर्गत ८६ उपकेंद्रात दूरशिक्षणच्या कोणत्याही अभ्यासक्रमाला विद्यार्थी प्रवेश घेवू शकतात. तसेच शिक्षणापासून वंचित राहणारे विद्यार्थी, नोकरदार, महिला यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात येता येणार आहे.



### डबल डिग्री सहज मिळणार

नवीन शैक्षणिक कायद्यानुसार एकाचवेळी दोन पदवीच्या अभ्यासक्रमाचे शिक्षण घेता येणार आहे. त्यामुळे दूरशिक्षणच्या पारंपारिक अभ्यासक्रमाबरोबर विद्यार्थ्यांना एमबीएचेही शिक्षण घेता येणार आहे. त्यासाठी वेगळे कष्ट करण्याची गरज नाही, अशी सुविधा दूरशिक्षण विभागाने केली आहे.

### फॅकल्टी चेंज परीक्षाच झाली बंद

पूर्वी कोणत्याही विषयातून दुसऱ्या एखाद्या विषयाला प्रवेश घ्यायचा असेल तर फॅकल्टी चेंजची परीक्षा देवून उत्तीर्ण व्हावे लागत होते. परंतु यंदापासून फॅकल्टी चेंजीची परीक्षाच बंद केली असून, कोणत्याही विषयाचा विद्यार्थी त्याच्या आवडीच्या दुसऱ्या विषयातही म्हणजेच एकाचवेळी दोन्ही विषयांची पदवी घेवू शकतात. त्यामुळे विद्यार्थ्यांना दूरशिक्षणच्या कोणत्याही विषयाला प्रवेश घेण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

### ऑनलाईनकडे विद्यार्थ्यांचा ओढा

दूरशिक्षण व्यवस्थेत पुस्तक तर ऑनलाईन अभ्यासक्रमात विषयांची ऑडीओ, व्हिडीओ व्याख्यान उपलब्ध होतात. विद्यार्थी त्यांच्या सवडीने ही व्याख्यान ऐकु किंवा पाहू शकतात. त्यामुळे सध्या विद्यार्थ्यांचा ऑनलाईन शिक्षणाकडे ओढा वाढत आहे. तसेच विद्यापीठाला नॅकचे एप्लसप्लस मानांकन मिळाल्याने वन कॅटेगिरीचा दर्जा युजीसीने शिवाजी विद्यापीठाला दिला आहे. त्यामुळेच दूरशिक्षणचा अभ्यासक्रम ऑनलाईन करण्याची परवानगी विद्यापीठाला मिळाली आहे.

**डॉ. व्ही. एन. शिंदे** (प्रभारी कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ)

### भविष्यात पारंपारिक अभ्यासक्रमही ऑनलाईन होणार

एमबीए ऑनलाईन करण्याची प्रक्रिया यशस्वीपणे पार पडल्यानंतर दूरशिक्षणचे सर्वच पारंपारिक अभ्यासक्रमही ऑनलाईन करण्याचा विद्यापीठातील दूरशिक्षण विभागाचा मानस आहे. कारण दूरशिक्षणच्या माध्यमातून दरवर्षी हजारो विद्यार्थी शिक्षण घेत असतात. हा अभ्यासक्रम ऑनलाईन केला तर प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या वाढणार आहे.

जनसंपर्क कक्ष
0 3 JUL 2023 लोकमत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# फेरतपासणीचे शुल्क आता भरा ऑनलाइन

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** गुणपडताळणी तसेच उत्तरपत्रिका फोटोकॉपीच्या अर्जाचे शुल्क ऑनलाइन भरण्याची सुविधा शिवाजी विद्यापीठाने नुकतीच कार्यान्वित केली. यामुळे विद्यार्थ्यांचा वेळ व खर्च वाचणार आहे.

विद्यापीठाच्या परीक्षांचे निकाल जाहीर झाल्यानंतर काही विद्यार्थी गुणपडताळणीसाठी तसेच उत्तरपत्रिकांची फोटोकॉपी मागणी व फोटोकॉपी प्राप्त झाल्यानंतर फेरतपासणीसाठी संगणक कार्यप्रणालीद्वारे ऑनलाइन अर्ज भरून विद्यापीठास सादर करतात. परंतु, या अर्जाचे शुल्क भरण्यासाठी सध्या कार्यान्वित असलेल्या संगणक कार्यप्रणालीमध्ये ऑनलाइन शुल्क भरण्याची सुविधा नसल्यामुळे विद्यार्थ्यांना शुल्क भरण्यासाठी समक्ष विद्यापीठामध्ये अथवा वित्त विभागाच्या पोर्टलवरून शुल्क भरावे लागत होते. यासाठी विद्यार्थ्यांचा वेळ व प्रवास खर्च होत होता. हे टाळण्यासाठी सध्या कार्यान्वित असलेल्या संगणक कार्यप्रणालीमधून ऑनलाइन पेमेंट गेटवेद्वारे गुणपडताळणी, उत्तरपत्रिकांची फोटोकॉपी मागणी, फेरतपासणी अर्जाचे शुल्क ऑनलाइन भरण्याची सुविधा उपलब्ध केली आहे.

पुढारी

# पदवी अभ्यासक्रम परीक्षेला ५,२४९ विद्यार्थी

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या मार्च-एप्रिल २०२३ उन्हाळी सत्रातील पदवी अभ्यासक्रमाच्या परीक्षेअंतर्गत रविवारी २२ अभ्यासक्रमांच्या परीक्षा झाल्या. परीक्षेला ५ हजार २४९ विद्यार्थी उपस्थित होते. दरम्यान, रविवारी डिप्लोमा इन ड्रामा, डिप्लोमा इन क्लासिकल म्युझिक, प्री-लॉ (पाच वर्षे), लॉ (तीन वर्षे) आदी ३९ अभ्यासक्रमांचे निकाल घोषित करण्यात आले.

आजअखेर १८८ अभ्यासक्रमांचे निकाल घोषित झाले आहेत, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.